Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# तुझे आहे तुजपाशी

29 Jul 2011, 0252 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

एखादी योजना, प्रकल्प, काम पूर्ण होण्यासाठी मन्युष्य-बळ, आथिर्क पाठबळ, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री या सगळ्या गोष्टी आवश्यक आहेतच; परंतु तुमचे उद्दिष्ट, ध्येय साध्य करण्यासाठी या सगळ्या गोष्टींबरोबरच महत्त्वाची असते ती तुमची इच्छाशक्ती. आपण वेळेचं, पैशांचं, मनुष्यबळाचं नियोजन करतो; परंतु आपल्या इच्छाशक्तीचं नियोजन करतो का? तुम्ही तुमची इच्छाशक्ती १० टक्क्यांनी वाढवली तरी परिणामात १०० टक्क्यांनी वाढ होऊ शकते. समर्थ रामदासांनी म्हटले आहे, 'जेणे जैसा निश्चय केला। तयासि तैसाचि फळला।।' म्हणजे जो जसा निश्चय करतो त्याला तसेच फळ मिळते. वेगळ्या भाषेत सांगायचे तर तुम्ही जे ठरवाल ते प्रत्यक्षात आणू शकता.

या वचनाचा प्रत्यय मी आमच्या तुळापूरच्या जीर्णोद्धार सोहळ्याच्या वेळी घेतला. तुळापूरच्या प्राचीन संगमेश्वराचा कायापालट करायचा संकल्प मी आणि माझी पत्नी चारुशीला हिने सोडला. या संपूर्ण प्रकल्पाचे योग्य नियोजन करून ठरलेल्या वेळेत हे काम आम्ही पूर्ण केले, पण पुढचा कार्यक्रम अधिक कठीण होता. दि. २५ ते ३० ऑक्टोबर या सहा दिवसांमध्ये प्रतिष्ठापना, कळसस्थापना असे धामिर्क विधी होणार होते. सांगता समारोह ७ नोव्हेंबरला होणार होता. आता हा सगळा कार्यक्रम तुळापुर-फुलगाव सारख्या छोट्या गावात कसा होणार? आलेल्या पाहुण्यांचे, निमंत्रित मान्यवरांचे स्वागत- पाहुणचार नीट होईल का? रोज जवळ जवळ दोन हजार लोक असणार होते, या सगळ्यांच्या निवासाची-भोजनाची व्यवस्था कशी होणार? हे प्रश्न माझ्याही मनात निर्माण झाले होते. परंतु एकदा मनाचा निर्धार झाला की मग कोणतीच अडचण तुमचा मार्ग अडवू शकत नाही. या सगळ्या पाहुण्यांची निवासाची सोय तुळापूर परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आली. व्यवस्थेतला मुख्य भाग होता भोजनाचा. ती जबाबदारी माझ्या पत्नीने समर्थपणे सांभाळली. श्री संगमेश्वराच्या सोहोळ्यासाठी चारही वेदशाखांचे ५६ ब्राह्माण बोलविण्यात आले होते. या सगळ्या ब्रह्मावृंदांचे नेतृत्व काशीचे वसंत भास्कर शिदोरे गुरुजी यांनी केले होते. सांगता समारोहाला करवीर-पीठाचे शंकराचार्य श्री विद्याशंकरभारती, व अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला सात-आठ हजारांचा जनसमुदाय लोटला होता. पण शंकराचार्यांच्या स्वागतापासून ते कार्यक्रमाची सांगता करणाऱ्या पं. भीमसेन जोशींच्या गायनापर्यंत सगळे कार्यक्रम अतिशय सुविहितपणे पार पडले, कारण त्याचे तसे नियोजन आम्ही केले होते. त्यामागे हा कार्यक्रम सूत्रबद्धपणे करायचा ही इच्छाशक्ती होती.

इच्छाशक्ती प्रत्येकातच असते, पण सगळ्यांना तिची जाणीव असतेच असं नाही. 'तुझे आहे तुजपाशी' हे वचन या बाबतीत नेहमी अनुभवायला मिळते. स्वत:मधील इच्छाशक्तीचा योग्य वापर करायला शिका आणि आयुष्यातील प्रत्येक कार्य यशस्वी करा.

- सुधीर निरगुडकर

Recommend Sign Up to see what your friends recommend.

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768